**कार्यालय पोलीस उप अधिक्षक,लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,जालना** **दिनांक २२/०२/२०१९**

**टोल फ्रि क्रमांक १०६४**

**कार्यालय दुरध्वनी क्र. :- ०२४८२-२२०२५२**

जिल्हा परिषद कार्यालय,जालना येथील जलसंधारण विभागातील शाखा अभियंता श्री.मोडवान यांना ४०००/- रुपयाची लाच घेतांना ॲन्टी करप्शन ब्युरो, जालना च्या पथकाने पकडले

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | आलोसे श्री.संजय दत्तात्रय मोडवान, वय 52 वर्षे, शाखा अभियंता, जलसंधारण विभाग,जिल्हा परिषद जालना वर्ग-2, रा.स्वामी समर्थ नगर, जिल्हा परिषदचे पाठीमाणे जि.जालना |
| २ | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दि.२२.०२.२०१९ रोजी जिल्हा परिषद जालनाचे पाठीमागे लाड हॉटेल येथे |
| ३ | लाचेची रक्कम | :- | ४०००/- रुपये |
| ४ | सापळा अधिकारी | :- | **श्री.आर.डि.निकाळजे, पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना** |

याबाबत हकीगत अशी आहे की, यातील तक्रारदार हे खाजगी गुत्तेदारीचे कामे करीत असुन तक्रारदार यांनी माऊली सेवाभावी संस्थे मार्फत साठवण तलावाचे गाळ काढण्याचे काम सन-२०१७ मध्ये केले होते.त्यानंतर गाळ काढण्याचे काम पुर्ण करुन सोसायटी मार्फत बिल सिंचन विभाग जिल्हा परिषद जालना येथे सादर केले होते. सदर पहील्या कामाचे देयक तक्रारदार यांना मिळाले होते. त्यानंतर दुसरे देयक बिल दोन महिन्यापुर्वी सादर केले होते सदर देयकाची रक्कम संस्थेच्या खात्यावर जमा न झाल्याने तक्रारदार यांना त्यांनी केलेल्या कामाचे पैसे मिळाले नव्हते.त्यामुळे तक्रारदार हे सिंचन विभाग,जि.प.जालना येथे गेले असता आलोसे श्री.मोडवान,शाखा अभियंता हे तक्रारदार यांना म्हणाले की, तुमच्या फाईलवर साहेबांची सही घेतल्या शिवाय बिल मिळणार नाही. साहेब अशी सही करणार नाहीत तुम्ही मला ५०००/ रुपये द्या मी साहेबांची सही घेवुन देतो. त्यावेळी तक्रारदार आलोसे श्री.मोडवान यांना म्हणाले की, साहेब मी खिशातुन पैसे टाकुन काम नियमाप्रमाणे केले आहे.त्यावर आलोसे श्री.मोडवान म्हणाले की, ते मला कांही सांगु नको बिल पाहीजे असेल तर ५०००/ रुपये दे नाहीतर मी क्युरी काढुन बिल परत करतो. त्यावर तक्रारदार त्यांना नाईलाजास्तव हो म्हणाले. तक्रारदार यांची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागा कडे तक्रार दिली.

दि.१५.०२.२०१९ रोजी जिल्हा परिषद जालना येथे जावुन शाखा अभियंता श्री.मोडवान यांची पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान आलोसे श्री.मोडवान यांनी पंचा समक्ष ५०००/- रुपयेची तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करुन तडजोडअंती ४०००/ रुपयेची लाचेची रक्कम स्विकारण्यास तयार झाल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन २२.०२.२०१९ रोजी जिल्हा परिषद जालनाचे पाठीमागे हॉटेल लाड येथे लाचेचा सापळा लावला असता आलोसे श्री.मोडवान,शाखा अभियंता यांनी लाचेची मागणी पंचा समक्ष करुन लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना लाचेच्या रक्कमेसह पकडण्यात आले. यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन अवाहन करण्यात येते की कोणी लोक सेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२-२२०२५२, तसेच टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं.८९७५७६२९०६ पोलीस निरीक्षक मो.नं. ९८२३१४२६३२, ९७६७७४७७७४ वर संपर्क करावा.**

( रविंद्र डी.निकाळजे )
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना